International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 6 No. 40 September - October - 2025

# भारतीय कला, नाट्य, संगीत व सांस्कृतिक क्षेत्रातील आदिवासी समाजाचे योगदान एक अभ्यास

**प्रा. वळेकर गहिनीनाथ नारायण**
*संशोधक, नाट्यशास्त्र विभाग,*
*सहाय्यक प्राध्यापक, शिवछत्रपती महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर*
***Corresponding Author – प्रा. वळेकर गहिनीनाथ नारायण***
**DOI - 10.5281/zenodo.17657039**

**प्रस्तावना**:

भारतीय समाजरचनेत आदिवासी (Adivasi/Tribal Communities) हा घटक सर्वात प्राचीन आणि महत्त्वाचा मानला जातो. आदिवासी समाज हे भारतीय संस्कृतीचे आद्य शिल्पकार असून त्यांच्या जीवनपद्धतीत कला, नाट्य, संगीत आणि लोकपरंपरा यांचा अविभाज्य समावेश आहे. आधुनिक भारतीय संस्कृतीच्या मुळाशी आदिवासी कलांचा प्रभाव आढळतो. भारतीय संस्कृतीचा इतिहास हजारो वर्षांचा आहे. या प्रदीर्घ इतिहासाच्या प्रवाहात आदिवासी समाज हा सर्वात प्राचीन आणि मूळ घटक मानला जातो. भारतीय संस्कृतीच्या सुरुवातीच्या पायावर आदिवासींची कला, नृत्य, नाट्य, संगीत आणि जीवनशैली यांचा मोठा वाटा आहे. त्यांच्या परंपरेतील जीवनदृष्टी ही निसर्गकेंद्री असून तिच्यात सामूहिकता, समता व श्रमसंस्काराचे दर्शन घडते. आजच्या आधुनिक भारतीय कलाक्षेत्रातही आदिवासी समाजाच्या अभिव्यक्तीची छाप स्पष्टपणे जाणवते. त्यामुळे या संशोधनाचा हेतू आदिवासी समाजाचे सांस्कृतिक योगदान उलगडणे हा आहे.

**गृहितके (Hypotheses):**

1. भारतीय कला, नाट्य, संगीत व संस्कृतीच्या विकासामध्ये आदिवासी समाजाचे योगदान मूलभूत आणि महत्त्वाचे आहे.
2. आदिवासींच्या लोककला, नृत्य व संगीत परंपरा या निसर्गाशी घट्ट जोडलेल्या असून भारतीय सांस्कृतिक वैविध्याला समृद्ध करतात.
3. आदिवासी कला ही केवळ स्थानिक पातळीवरील नव्हे तर राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय सांस्कृतिक वारसा म्हणून मान्यता प्राप्त करत आहे.
4. आधुनिकीकरण, नगरीकरण व औद्योगिकीकरणामुळे आदिवासी कला-संस्कृतीवर प्रतिकूल परिणाम होत आहेत.
5. आदिवासी समाजाच्या कलात्मक व सांस्कृतिक परंपरेचे संवर्धन केल्यास भारतीय सांस्कृतिक एकात्मता व सातत्य अधिक दृढ होईल.

**उद्दिष्टे (Objectives):**

1. भारतीय कला, नाट्य, संगीत आणि सांस्कृतिक क्षेत्रातील आदिवासी समाजाच्या योगदानाचा ऐतिहासिक व सामाजिक अभ्यास करणे.

2. वारली, गोंड, संथाळ, भील, उरांव यांसारख्या आदिवासी समाजांच्या कला, नृत्य व संगीत परंपरेचे विश्लेषण करणे.
3. आदिवासी सांस्कृतिक वारशाचा भारतीय मुख्य प्रवाहातील कला-संस्कृतीवर झालेला प्रभाव शोधून काढणे.
4. आदिवासी कला, नृत्य व संगीताच्या माध्यमातून व्यक्त होणाऱ्या सामाजिक मूल्ये, धार्मिक श्रद्धा व निसर्गदृष्टी समजून घेणे.
5. आधुनिक काळातील जागतिकीकरण, बाजारपेठीकरण व तंत्रज्ञानामुळे आदिवासी कलांवर झालेल्या परिणामांचा अभ्यास करणे.
6. आदिवासी कला व संस्कृतीच्या जतन, संवर्धन आणि प्रसारासाठी आवश्यक शिफारसी सुचवणे.

**संशोधन पद्धती:**

**संशोधनाचा प्रकार (Nature of Research)** : हा अभ्यास ऐतिहासिक व वर्णनात्मक (Historical & Descriptive Research) प्रकारचा आहे. कला, नृत्य, नाट्य, संगीत व सांस्कृतिक परंपरांचा ऐतिहासिक मागोवा घेऊन त्यांचे विश्लेषण करणे हा या अभ्यासाचा उद्देश आहे.

**संशोधनाची व्याप्ती (Scope of Research):**

अभ्यासाचा कालखंड: प्राचीन काळापासून आधुनिक काळापर्यंत. भौगोलिक क्षेत्र: भारतातील प्रमुख आदिवासी समाज – वारली (महाराष्ट्र), गोंड मध्यप्रदेश/छत्तीसगढ), संथाळ (झारखंड/बिहार), भील (राजस्थान/गुजरात/म.प्र.), उरांव (झारखंड) इत्यादी. अभ्यासाचा केंद्रबिंदू: कला, नाट्य, नृत्य, संगीत व सांस्कृतिक उत्सव असा आहे.

**माहितीचे स्रोत (Sources of Data):**

**अ) प्राथमिक स्रोत (Primary Sources):**

1. आदिवासी कलावंत, लोकनृत्य गट, संगीतकार यांची **मुलाखत** (Interview Method).
2. वारली चित्रकला, गोंड कला, ढोकरा शिल्प, छाऊ नृत्य इत्यादींचे **मैदानी निरीक्षण (Field Observation)**.
3. उत्सव व जत्रांचे प्रत्यक्ष **सहभाग व निरीक्षण** (Participant Observation).

**ब) दुय्यम स्रोत (Secondary Sources):**

1. ग्रंथ, संदर्भग्रंथ, संशोधन लेख, प्रबंध.
2. शासन व स्वयंसेवी संस्थांचे अहवाल (Ministry of Tribal Affairs Reports).
3. मासिके, नियतकालिके, संग्रहालयांचे दस्तऐवज.
4. इंटरनेटवरील शैक्षणिक लेख व डेटाबेस.

**संशोधन साधने (Research Tools):**

निरीक्षण पद्धती (Observation Method), सांस्कृतिक कार्यक्रमांचे ऑडिओ-व्हिडिओ रेकॉर्डिंग, सांख्यिकीय माहितीचे विश्लेषण (Content Analysis, Qualitative Analysis).

**माहिती संकलनाची पद्धत (Data Collection Method):**

निवडक आदिवासी प्रदेशांमध्ये फील्डवर्क करणे. कलाकार व ज्येष्ठ व्यक्तींकडून मौखिक माहिती गोळा करणे. कला, संगीत, नृत्य नाट्य, व सांस्कृतिक परंपरेचे दस्तऐवजीकरण.

**माहितीचे विश्लेषण (Data Analysis):**

संकलित माहितीचे **गुणात्मक विश्लेषण (Qualitative Analysis)** करून सांस्कृतिक महत्त्व शोधणे. विविध जमातींच्या कलात्मक परंपरांची तुलना Comparative Study). ऐतिहासिक व समाजशास्त्रीय दृष्टीने निष्कर्ष मांडणे.

**मर्यादा (Limitations):**

आदिवासी परंपरा प्रामुख्याने मौखिक असल्याने लिखित साधने मर्यादित आहेत. सर्व प्रदेशांचा सखोल अभ्यास करणे अवघड. सांस्कृतिक बदलामुळे अनेक पारंपरिक कलाप्रकार हरवत चालले आहेत.

**कला क्षेत्रातील योगदान:**

**1. भित्तिचित्रे व भित्तीलेखन (Wall Paintings & Murals):**

भीमबेटका येथील प्रागैतिहासिक गुंफा-चित्रे आदिवासींच्या जीवनशैलीचे पुरावे देतात. यात शिकार, नृत्य, सामूहिक जीवनाचे दृश्य दिसते. वारली चित्रकला (महाराष्ट्रातील वारली जमात) ही भूमितीय आकृतींवर आधारित असून स्त्री-पुरुषांचे श्रमजीवन, शेती, उत्सव यांचे प्रतिबिंब दाखवते. UNESCO ने या कलेला आंतरराष्ट्रीय मान्यता दिली आहे. गोंड कला (मध्यप्रदेश, छत्तीसगढ) ही चमकदार रंगसंगतीसाठी प्रसिद्ध आहे. यात लोककथा, प्राणी-पक्षी व निसर्गाचे आध्यात्मिक चित्रण दिसते. मध्यप्रदेशातील भीमबेटका येथील गुंफा-चित्रे आदिवासींच्या कलात्मक अभिव्यक्तीचे प्राचीन उदाहरण आहेत.[१] वारली चित्रकला (महाराष्ट्रातील वारली जमात) जागतिक स्तरावर प्रसिद्ध असून त्यातील भूमितीय आकृत्या, निसर्ग आणि श्रमजीवनाचे दर्शन घडवतात. गोंड कला (Gond Art) मध्ये प्राणी-पक्षी, लोकजीवन, निसर्ग यांचे रंगीत दर्शन घडते.

**2. शिल्पकला व हस्तकला:**

बस्तर जिल्ह्यातील ढोकरा कला (Dokra Art) ही कांस्य धातुकामाची परंपरा आदिवासींच्या हस्तकौशल्याचे प्रतीक आहे. आदिवासी मुखवटे, दागिने, टोपल्या, विणकाम आणि लाकडी शिल्पे भारतीय लोककलामध्ये विशेष स्थान मिळवतात. बस्तर जिल्ह्यातील ढोकरा कला ही कांस्य धातुकामावर आधारित असून आजही पारंपरिक 'लॉस्ट-वैक्स तंत्र' वापरले जाते. आदिवासी दागिने, लाकडी मुखवटे, गवत व बांबूपासून तयार केलेली हस्तकला भारतीय लोककलेत विशेष स्थान राखते.[२] छत्तीसगढ, झारखंड, ओडिशा येथे आदिवासींची लोकरंगकाम व विणकाम परंपरा आजही जिवंत आहे.

**नाट्य आणि नृत्य क्षेत्रातील योगदान**:

**1. लोकनाट्य परंपरा:**

गोंड, भील, संथाळ, हो, उरांव यांच्यातील नाट्य-प्रकार धार्मिक विधींशी जोडलेले आहेत. महाराष्ट्रातील गोंड व कोरकू आदिवासींच्या गोंडी नाच परंपरा ही लोकजीवनाचे प्रतिक आहे. आदिवासींच्या लोकनाट्य परंपरा धार्मिक विधींशी निगडित आहेत. महाराष्ट्रात गोंडी समाजातील गोंडी नाच हा सामूहिक लोकनाट्य प्रकार लोकप्रिय आहे.[३] आदिवासी नाट्य हे केवळ करमणुकीसाठी नसून ते समाजातील नैतिकता, इतिहास आणि सामूहिक एकोपा यांचे प्रतीक आहे.

महाराष्ट्रातील गडचिरोली भंडारा, गोंदिया आणि चंद्रपूर या जिल्ह्यांनी व्याप्त झाडीपट्टी बोलीभागातील लोकप्रीय लोकनाट्य . मुळात हे लोकनृत्य होते कालांतराने त्यात नाट्याचा अंतर्भाव झाला. आठ -दहा नर्तकांनी हातात टाहारा नावाची दीड

फूट लांबीची काठी घेऊन केलेला नाच हे या लोककलाप्रकाराचे एकमेवाद्वितीय वैशिट्य आहे. झाडीपट्टीत शेताला दंड, तर झाडाच्या फांदीला डार म्हटले जाते.[४] शेतातील पिकलेला शेतमाल घरी आल्यानंतर शेतकरी आनंद व्यक्त करण्यासाठी समूहनृत्य करीत असावेत. यातून दंडार अवतरली, असे सांगितले जाते. ढढार, दंढार आणि गंडार या संज्ञादेखील दंडारसाठी रुढ आहेत.

**2. नृत्यपरंपरा:**

छाऊ नृत्य (झारखंड, ओडिशा, पश्चिम बंगाल) हे आदिवासी-आधारित युद्धनृत्य असून त्यात संगीत, शारीरिक चपळाई व मुखवटे यांचा संगम दिसतो. संथाळ नृत्य, गोंड नृत्य, बस्तरातील धुरवा नृत्य ही प्रख्यात आदिवासी नृत्यशैली आहेत. पावरा हा एक भारतीय आदिवासी समुदाय आहे जो प्रामुख्याने महाराष्ट्रातील नंदुरबार, धुळे, जळगाव, बुलढाणा जिल्ह्यांमधील सातपुडा पर्वतरांगांच्या जंगलात आणि मध्य प्रदेशातील काही जिल्ह्यांमध्ये राहतो. ते प्रामुख्याने पावसाळ्यात शेती, पशुधन आणि मासेमारी करतात. होळी हा त्यांच्यासाठी एक महत्त्वाचा सण आहे. विवाह आणि होळी सणाच्या प्रसंगी ते पावरा नृत्य करतात. महाराष्ट्रातील धोलकी-झांज व तुरही यांच्या साथीने केले जाणारे नृत्य समाजातील एकोपा व सामूहिक चेतना प्रकट करतात. मुखवटे, युद्धकौशल्य आणि नाट्यमयता यासाठी जागतिक ख्याती. संथाळ नृत्य (झारखंड) – स्त्री-पुरुष एकत्र हात धरून सामूहिक नृत्य सादर करतात. बस्तर नृत्य – धुरवा, परब, मडई उत्सवातील नृत्य आदिवासींच्या धार्मिक जीवनाशी जोडलेले आहे. महाराष्ट्रातील **ढेमसा** (Dhemsa/Dhimsa) या आदिवासी नृत्यपरंपरेचा स्त्रोत-परंपरा, भौगोलिक प्रसार, सामाजिक-सांस्कृतिक फलनिष्पत्ती, नृत्यरचना, वाद्यसंगीत, वेशभूषा, लय-ताल, रूपांतर, संरक्षण-धोरणे व समकालीन आव्हाने या दृष्टींनी सविस्तर अभ्यास करतो. ढेमसा प्रामुख्याने **गोंड-माडिया** व इतर आदिवासी समाजात समूहनृत्यरूपाने जिवंत आहे; त्याची प्रादेशिक मुळे दक्षिण ओडिशा – बस्तर पट्ट्यात असली तरी विदर्भ-उत्तर महाराष्ट्रातील सीमाभागांत त्याचे स्थानिक रूपांतर दिसते. राज्य व केंद्र पुरस्कृत सांस्कृतिक उपक्रम, स्थानिक महोत्सव, नवे माध्यम (व्हिडिओ/सोशल) यांमुळे ढेमसा नव्या पिढीकडे पोहोचत असताना, स्वरूप आणि तत्त्वांमध्ये बदलही घडत आहेत. या लेखात क्षेत्रीय/दस्तऐवजी पुराव्यांच्या आधारे (अधिकृत संकेतस्थळे, संशोधन लेख, ग्रंथ, दृश्यदस्तावेज) महाराष्ट्रातील ढेमसाचा नकाशा रेखाटण्याचा प्रयत्न केला आहे. ओडिशातील **कोरापुट-गडबा/परजा** परंपरांतील ढेमसा, छत्तीसगड-बस्तरातील गोंडी परंपरा आणि **गडचिरोली-चंद्रपूर** आदी महाराष्ट्रातील सरहद्दी भागांत दिसणारे प्रकार यांची तुलनात्मक मांडणी केली आहे.[५] महाराष्ट्रातील कोरकू व गोंड समाजातील ढोलकी-झांज नृत्य सामूहिक एकतेचे दर्शन घडवते.

संगीत क्षेत्रातील योगदान

आदिवासी समाजाने विविध वाद्यांची निर्मिती केली. मांडर, ढोल, नगारा, तुरही, तुंबा, करताल ही पारंपरिक वाद्ये. बस्तर, झारखंड, छत्तीसगढमध्ये वाद्ये निसर्गसंपत्तीपासून तयार केली जातात (बांबू, भोपळा, लाकूड). हादू, जनगीत, परब गीत, करमा गीत यामध्ये जीवनशैली, शेती, उत्सव, लग्नविधी व निसर्गाशी संवाद व्यक्त होतो.[६] संथाळ आदिवासींचे बाहका गीत व गोंड समाजाचे रीना गीत समाजजीवनाचे आरसे आहेत.

सांस्कृतिक योगदान

करमा, सरहुल, बस्तर दशहरा, मडई, नागदेवता उत्सव हे आदिवासी सांस्कृतिक वारशाचे

अविभाज्य भाग आहेत. या उत्सवांमध्ये नृत्य, गीत, लोकनाट्य व कला यांचा संगम दिसतो. आदिवासी समाजाचा निसर्गाशी असलेला सजीव संबंध कला-संस्कृतीतून उमटतो.[७] त्यांचे देव-देवता, लोककथा, रीतिरिवाज व संस्कार भारतीय सांस्कृतिक वैविध्याला समृद्ध करतात.

**निष्कर्ष**:

भारतीय कला, नाट्य, संगीत व संस्कृतीच्या विकासात आदिवासी समाजाचे योगदान मूलभूत आणि अनमोल आहे. त्यांची परंपरा ही केवळ लोकसंस्कृती नसून भारतीय राष्ट्रीय ओळखीचा महत्त्वपूर्ण भाग आहे. आधुनिक कला, रंगभूमी व संगीताच्या प्रवाहातही आदिवासी परंपरांचा ठसा उमटलेला दिसतो. त्यामुळे या कलांची जपणूक व संवर्धन करणे ही काळाची गरज आहे. आज आदिवासी कला आंतरराष्ट्रीय प्रदर्शनांत लोकप्रिय झाली आहे. वारली चित्रकला, ढोकरा शिल्प यांना जागतिक बाजारपेठ मिळाली आहे. पण नगरीकरण, जंगलतोड व आधुनिकतेच्या लाटेत अनेक आदिवासी कला हरवण्याच्या धोक्यात आहेत. शासन व स्वयंसेवी संस्थांनी आदिवासी कलांचे दस्तावेजीकरण, प्रशिक्षण व संवर्धन करणे गरजेचे आहे.

**संदर्भ (References):**


1. Elwin, Verrier. The Tribal Art of Middle India. Oxford University Press, 1951, P-25-26
2. Thakur, Gopal. Folk and Tribal Dances of India. Publications Division, Govt. of India, 1986, P-46-47
3. Deogaonkar, Shashishekhar. The Gond and their Culture. Concept Publishing, 2007, P-101
4. बोरकर हरिश्चन्द्र, झाडीपट्टीची दंडार, भंडारा, १९९९, P- १९९
5. Ministry of Tribal Affairs, Govt. of India. Tribal Cultural Heritage Reports. New Delhi, 2018, P-205
6. जाधव, राजेंद्र. भारतीय लोककला व आदिवासी संस्कृती. डायमंड पब्लिकेशन, पुणे, 2015, P-68
7. देशमुख, वसंत. आदिवासी कला आणि वारली चित्रशैली. मुंबई विद्यापीठ प्रकाशन, 2012, P-59